CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

भारत इतिहास संशोधक मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ३७

मंडळांतील नाणीं.

लेखक

गणेश हरी खरे.

श्रीक्षेत्र आळंदी, दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें १ ला खंड,
इत्यादि पुस्तकांचे लेखक व शिवचरित्रसाहित्य ३ रा खंड
याचे एक संपादक.

४७६।

किंमत १ रुपाया.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

शोध.

पृ. १	ओळ १४	चौकटी कंसापुढें '[गो] **तमी पुतस** ' हा मजकूर व भोवतीं बिंदुमय कडें
पृ. ४	ओळ १६	**दुहेरी कड्यांतः** शाह मुहम्मद
पृ. ७	ओळ १९	तुग्लक्क शाह ७२७
पृ. १०	टीपेची जरूरी नाहीं	
पृ. १६	ओळ ६	साल सख
पृ. १७	ओळ १५	झुहरा नगर
पृ. १९	ओळ १	२ ऱ्या, ३ ऱ्या, ४ थ्या कोष्टकांचे आरंभीं अनुक्रमें वजन, आकार, काल हे शब्द पाहिजेत.
पृ. १९	ओळ २	पहिल्या कोष्टकांतील हैद्राबाद शब्द गाळावा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

4761

निवेदन.

स्वीय ग्रंथमालेंत आज जें **नाण्यांचें पुस्तक** प्रकाशित होत आहे तें या विषयावरील मराठींत अगदीं **पहिलेंच पुस्तक** होय. इतिहासविषयक अनेक लहान मोठे ग्रंथ मराठी भाषेंत झाले आहेत; किंबहुना देशी भाषांमध्यें मराठीइतकी प्रगति साधनसिद्धांतविषयक ऐतिहासिक ग्रंथांत दुसरीकडे कोठेंच झाली नाहीं. असें असतां नाण्यांसंबंधीं संशोधन व परिचय दोन्ही दृष्टींचें लिखाण मराठींत प्रायः नाहींच म्हटलें तरी चालेल. न्यूमिस्मॅटिक् सोसायटी मुंबईस असूनहि मराठी वाङ्मयांत नाण्यांविषयीं कांहींच विचार येऊं नयेत ही खेदाची गोष्ट होय ! देशी विद्वानांतहि नाण्यांचे शोधक या प्रांतीं थोडकेच म्हटलें तरी चालेल.

वास्तविक मुद्राशास्त्र (नाणकशास्त्र) चा उपयोग इतिहाससाधन म्हणून पुष्कळच आहे. नाण्यांचे साहाय्यानें बरींच निश्चित विधानें करतां येतात. विशेषें, करून कालचक्षूच्या उपलब्धीला नाण्यांचा उपयोग फारच होतो. असें असतां महाराष्ट्रसंशोधकांत कोणी नाण्यांचा पंडित निघूं नये याचा विषाद वाटतो. पुण्यासारख्या ठिकाणीं नाण्यांचा एकहि नामांकित संग्रह नाहीं ही केवढी लज्जेची गोष्ट आहे ! असें तर नसेल कीं, ऐतिहासिक कालांत महाराष्ट्रीयांचीं अशीं नाणींच थोडीं-त्यामुळें आमच्या राजांचेंच जर लक्ष नाण्यांकडे नाहीं तर समाजांत तेंच औदासीन्य किंवा दुर्लक्ष परंपरेनें उतरलें असेल ! शिवाजीचाच शिवराई परवापरवापर्यंत पुण्याच्या मंडईंत आम्ही वापरीत होतों ! पेशव्यांचे किंवा इतर छत्रपतींचे स्वतंत्र पैसे आढळत नाहींत. नाण्यांच्या या बाह्य दुर्भिक्षावरूनहि महाराष्ट्र हा नाणावटी देश नव्हे असें एक प्राथमिक अनुमान सहज करतां येतें.

तें कसेंही असो, इतिहाससाधनांत नाण्यांस महत्त्वाचें स्थान आहे आणि म्हणूनच आपणांस नाण्यांचा अभ्यास कर्तव्य आहे. भा. इ. सं. मंडळांत शके १८३९ पासून नाण्यांचा संग्रह करण्याकडे उत्सुकतेनें लक्ष्य पोंचविण्यांत आलें. मंडळांतील उत्साही व तरुण संशोधक श्री. वा. सी. बेंद्रे यांनीं हें काम हौसेनें अंगावर घेतलें. ' अकबराचीं नाणीं ' हा त्यांचा निबंध त्यांनीं परिश्रमानें तयार केला व तो छापला. त्यामुळें या विषयाकडे अधिक लक्ष लागेल अशी आशा मनांत बाळगिली होती. मंडळांतील नाणीं निवडून त्यांचा एक प्रतिमातक्ताहि मंडळानें छापला. याचा परिणाम एवढाच झाला कीं, कांहीं आस्थेवाईक मंडळी संग्रहार्थ मंडळाकडे नाणीं पाठवूं लागली. अशीं आलेलीं नाणीं निरनिराळ्या डब्यांत त्या त्या पाठविणारांचे नांवें स्वतंत्रपणें ठेविलेलीं असत. परंतु पुढें नवीन इमारतींत स्थलांतर करतेसमयीं गैरमाहितीमुळें नाण्यांची गल्लत केली गेली. पण मग हळहळून उपयोग काय ! अद्यापि नाण्यांवरील लेख चिकाटीनें वाचून, नंतर नाणीं शास्त्रोक्तरीत्या लावून त्यांचा संग्रह करण्याचें कोणी मनावर घेईना. चित्रें,

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नाणीं, शस्त्रें, पोथ्या, वस्त्रें, अनेक वस्तू जमूं लागल्या. इतक्या वस्तूंचा परामर्श घेणारे तज्ज्ञ मंडळापाशीं उपलब्ध नव्हते. त्याचें द्रव्यसामर्थ्य तर अल्पच होतें ! त्यामुळें ही शाखा कांहीं जोरावेना.

पुढें कै. रा. दाते एम्. ए. यांनीं आमचे सूचनेवरून एकंदर ऐतिहासिक अजबखान्याच्या शास्त्रशुद्ध सजावटीचा अभ्यास सुरू केला आणि नाण्यांचें संरक्षण, वर्गीकिरण, वाचन वगैरेंसाठीं ते मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स् म्युझियम मधील नाणकतज्ज्ञ रा. आचार्य यांजकडे गेले. रा. आचार्य यांनीं त्यांस सर्व प्रकारें साहाय्य दिलें आणि रा. दाते यांनीं नाण्यांचें वर्गीकरणहि करून आणलें. वस्तु-संग्रहालयाचे व्यवस्थेबाबत एक छोटेसें पुस्तक त्यांनीं लिहूनहि काढिलें होतें. परंतु रा. दाते यांचे मृत्यूमुळें सर्वच ग्रंथ आटोपला ! रा. दाते यांच्या मृत्यूमुळें ही अशी मोठीच हानी झाली.

पुढें रा. ग. ह. खरे यांनीं मंडळांत येऊन अल्पावधींतच अनेक शाखांकडे लक्ष्य पुरविलें. यावेळीं बऱ्याच नाण्यांचा संग्रह मंडळापाशीं झाला होता. पैकीं रा. मोडक नांवाच्या वृद्ध पेन्शनरांनीं चांदीच्या भावानें कांहीं चांदीचीं नाणीं (सुमारें १५।२०) विकत दिलीं आणि सरकारी कचेरींतून एका प्रसंगीं जुनी शिवराई, ई. इं. कंपनीचे पैसे असा तांब्याच्या नाण्यांचा सुमारें ४०० नगांचा संग्रह तांब्याचे किंमतीनें हातीं आला. विकत घेतलीं अशीं बहुतेक एवढींच. बाकी सर्व संग्रह मंडळाच्या संशोधकांनीं व मंडळप्रेमी सज्जनांनीं जमवून आणलेला असाच आहे.

महाराष्ट्राच्या जमिनीचा गुणच असा विलक्षण आढळतो कीं, येथें स्वप्रयत्नाचे बळावर उद्यास येणाऱ्या व्यक्ति निपजाव्या. राजवाडे, खरे, पारसनीस यांनीं इतिहास-संशोधनाचें प्रचंड कार्य केलें तें असेंच. कै. वझे यांनीं शिल्पशास्त्राचें अध्ययन, संशो-धन केलें तेंहि असेंच. थोड्या निराळ्या दृष्टीनें मुंबईचे रामचंद्र हरी गाडगीळ यांची गणना वरील मालिकेंत करतां येईल. रा. गाडगीळांचा जन्म पोस्ट खात्यांत नोकरींत गेला. पण त्यांस नाणीं जमा करण्याचा छंद लागला आणि मग त्यांचा अभ्यासहि करण्याची इच्छा उत्पन्न होऊन आज महाराष्ट्रांत किंबहुना उभ्या हिंदु-स्थानांत कोणाहि खाजगी व्यक्तीजवळ नसेल एवढा अफाट, निवडक व दुर्लभ नाण्यांचा संग्रह त्यांनीं परिश्रमानें जमा केला आहे. आपल्या आयुष्यभरांतलि परिश्रमाचें फळ त्यांनीं स्वार्थत्यागपूर्वक सर्व देशाला समर्पण करून महाराष्ट्रीय स्वार्थत्यागाच्या भीमरथींत आपलाहि ओघ मिळवावा अशी त्यांना आमची जाहीर विनंति आहे. रा. गाडगीळ यांनीं आपल्या संग्रहाचीं बहुमूल्य प्रतिमापुस्तकें भा. इ. सं. मंडळास नजर करून प्रारंभ तर केलाच आहे ! रा. गाडगीळ यांचा संग्रह देशांतच राहील हें पाहणें त्यांच्या प्रमाणेंच सरकार, धनिक, मुंबई विद्यापीठ व विद्वत्संस्था यांचेंहि काम आहे.

मंडळाचे वृत्तांतांतून या प्रकरणीं जे उल्लेख सांपडतात त्यांवरून नाणीं व तीं देणारे यांविषयीं पुढील माहिती निघतेः—

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कै. स. म. दिवेकर–दिल्ली-सुलतानांचीं चार.

श्री. बाबासाहेब देशपांडे–साहसमल्लांचें व इतर कांहीं अर्वाचीन.

श्री. रा. ह. गाडगीळ–विस्वे.

श्री. रावसो. पां. ज्ञा. कुलकर्णी:–इ. ई. कंपनीचे रुपये व पैसे.

श्री. राव ब. वा. आ. बांबर्डेकर:– क्षत्रप (२); त्रैकूटक (१) व मुघल(५).

श्री. ल. ब. गोडबोले–बहमनी (५)

श्री. भि. रु. जोशी—बहमनी व टिपू (१५)

श्री. वि. रा. शिंदे—प्राचीन (१)

श्री. रु. ग. अभ्यंकर (वाई)—कांहीं प्राचीन (सुमारें ८)

श्री. प्रो. द. वा. पोतदार–गणपती रुपया व इतर कांहीं तांब्याचीं.

याखेरीज श्री. वा. वि. जोशी (सातारा), कै. रा. सा. वि. अ. पटवर्धन, कै. ग. स. खरे (जंत्रीकार), श्री. नरवणे (धारवाड), श्री. भावे, मिया आतार, श्री. सरदार मुजुमदार, आणि मंडळाचे माजी दप्तरदार, श्री. आबा चांदोरकर व या ग्रंथाचे संपादक रा. ग. ह. खरे प्रभृतींनीं जमवून दिलेल्या नाण्यांचेहि उल्लेख सांपडतात. उल्लेखांची ही यादी अगदीं परिपूर्ण आहे असें म्हणतां येत नाहीं आणि म्हणूनच ज्यांचीं नांवें वर आलीं नसतील त्यांनीं कृपेनें तसें कळवावें म्हणजे तपास करून दुरुस्त यादी प्रसिद्ध करण्यास बरें पडेल. या सर्व मंडळींचे आम्ही अत्यंत आभारी आहों.

रा. ग. ह. खरे यांनीं कै. दाते यांनीं वर्गीकृत केलेलीं व इतर नाणीं स्वतः तपासून, लावून, वाचून, विशेष उपयुक्त व महत्त्वाचीं दिसलीं त्यांची सर्व शास्त्रीय माहिती या ग्रंथांत गोंविली आहे.

रा. खरे यांनीं आपलें काम अत्यंत कसोशीनें केलें आहे आणि जरी ग्रंथ-सामुग्रीच्या वगैरे अभावामुळें तें याहूनहि अधिक निर्दोष करतां आलें नाहीं तथापि एकंदरींत मराठींत नाण्यासंबंधीं सशास्त्र पद्धतीची एवढी माहिती देणारा **हाच पहिला ग्रंथ प्रसिद्ध** होत आहे असें म्हणावयास आम्हांस संकोच वाटत नाहीं.

अरबी वाचनाचें अवश्य तें काम मंडळांतील मुनशींचे साहाय्यानें पूर्ण करतां येईल.

रा. खरे यांची यादी झाल्यावर कांहीं पूर्तकाली नाणीं आम्हांस पणजीचे रा. भेंब्रे यांचे कृपेनें मिळालीं. त्यांत रेस वगैरे बरींच नाणीं आहेत. त्यांची लावणी, वाचणी वगैरे अजून व्हावयाची आहे; त्यामुळें आजच्या यादींत त्यांचा समावेश झाला नाहीं.

इतरहि कांहीं नाणीं अजून न लागलेलीं शिल्लक आहेत. पुढील भागांतून त्यांचा परामर्ष होईल.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

हा ग्रंथ प्रसिद्ध करून ट्रेझर ट्रोव्ह कायद्याप्रमाणें सरकारांत येणारीं नाणीं मंडळाच्या संग्रहालाहि यथाक्रम मिळावी अशी आमची इच्छा आहे.

तसेंच इतर ठिकाणचे संग्रह व मंडळ यांच्यांत दुबारांची अदलाबदलहि करून मिळावी अशी खटपट करतां येईल. केवळ दुबारांची देणगीहि संग्रहास मिळूं शकेल

येथें खाजगी धनिक विशेषतः सराफसावकार मंडळीस आम्हांस एक विनंति मंडळातर्फे करावयाची आहे. या मंडळीजवळ जुन्या नाण्यांचा संग्रह व्यवहार आणि पूजा या निमित्तांनीं झालेला असतो. तो मंडळाकडून तपासून घेऊन त्यांतील दुबारीं, अनवश्यक अशीं नाणीं मंडळसंग्रहासाठीं त्यांनीं द्यावीं, म्हणजे थोड्याच वर्षांत आपल्या महाराष्ट्राच्या केंद्रस्थळीं नाण्यांचा मोठाच संग्रह सशास्त्रपद्धतीनें जोपासलेला आपण पाहूं. जमखिंडी येथें घोड्यांच्या गळ्यांत घालावयाच्या माळा विजयनगरी होनांच्या आहेत. असेहि संग्रह पाहून तेथून जोड करून घेतली पाहिजे. संस्थानिकांनीं व धनिकांनीं मंडळाकडून आपापले संग्रह लावून घेऊन व्यवस्थित ठेवण्याची जरी काळजी घेतली तरी पुष्कळ फायदा होईल.

या पुस्तकासाठीं नाण्यांचे ठसे तयार करून जोडले आहेत. हें काम येथें पाश्चिमात्य देशांप्रमाणें सुबक होत नाहीं. तथापि आम्ही शक्य तो प्रयत्न केला आहे. प्रस्तुतच्या प्रतिमा श्रीमंत बाळासाहेब पंत प्रतिनिधि औंधकर यांच्या औंध आर्टप्रेसमधून तयार करून घेतल्या आहेत. याहीपेक्षां अधिक सुधारलेल्या प्रतिमा पुढें तयार करवून घेऊं आणि आपलें काम पहिल्या प्रतीचें शास्त्रीय करण्याची आम्ही शिकस्त करूं.

आजच्या ग्रंथाच्या मुद्रणासाठीं आमचे इतिहासकोविद मित्र व मंडळाचे विद्वान् सभासद श्री. त्र्यं. शं. शेजवलकर 'प्रगति'कर्ते यांचे मार्फत जी ८०० रु. ची देणगी मंडळाकडे आली त्यांतून सारा खर्च केला आहे आणि वास्तव या ग्रंथ-प्रकाशनाचें श्रेय उदार अनामिक दाते व मंडळाचे प्रशंसक रा. शेजवलकर यांचे-कडेच देणें उचित होईल.

हा ग्रंथ शिक्षणांत प्राथमिक शाळांपासून तों कॉलेजापर्यंत सर्वत्र उपयोगी पडेल आणि तसा त्याचा उपयोग करण्यांत येईल तरच तो प्रसिद्ध केल्याचा मोठा व्यावहारिक फायदा दिसून आल्याचें समाधान कर्त्यांस व प्रकाशकांस लाभेल.

असो. बंगालींत व हिंदींत मुद्राशास्त्रावर रा. राखालदास बानर्जींचा एक सुंदर ग्रंथ उपलब्ध आहे. मराठींत हा आज एक प्रसिद्ध होत आहे. हळूहळू देशी भाषांतून असले ग्रंथ विपुल प्रमाणांत प्रसिद्ध होतील आणि नाण्यांचा सशास्त्र अभ्यास व अभिरुचि संवर्धित करतील यांत संशय नाहीं.

भाद्रपद वा ८
श. १८५५

दत्तो वामन पोतदार,
चिटणीस,
भा. इ. सं. मंडळ, पुणें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

प्रस्तावना.

मंडळांत असलेल्या नाण्यांची कांहीं व्यवस्था लावावी असें मंडळाधिकाऱ्यांच्या मनांत बरेच दिवस घोळत होतें. त्या व्यवस्थेची पहिली पायरी म्हणून श्री. वा. सी. बेंद्रे यांनीं मंडळ त्रैमासिकाच्या पहिल्या वर्षाच्या २ व ३ या जोड अंकांत नाण्यांच्या परिचयाविषयीं एक लेख लिहिला. नंतर कांहीं वर्षांनीं कै. गो. त्र्यं. दाते M. A. यांनीं श्री. आचार्य क्यूरेटर, ऑर्किऑलॉजिकल सेक्शन प्रिन्स ऑफ वेल्स् म्यूझिअम मुंबई यांच्या मदतीनें नाण्यांचें वर्गीकरण करून आणिलें. त्यावेळीं श्री. आचार्य यांची अशी समजूत होती कीं, मंडळास नाण्यांचा कॅटलॉग तयार करावयाचा नसून केवळ यादी प्रसिद्ध करावयाची आहे. या दृष्टीनें त्यांनीं नाण्यानें दाखविलेला राजा, काल, धातू अशा २।३ ढोबळ गोष्टी सांगितल्या होत्या. पुढील काम कै. दाते करणार होते. पण दुर्दैवानें त्यांचा अकालींच अंत झाल्यामुळें पुढील काम मला करावें लागलें. मी केलेल्या कामांचे प्रकार म्हणजे नाण्यांचें वजन व आकार मोजणें, त्यावरील लेख वाचणें, त्यांच्या पाठपोटांचें यथातथ्य वर्णन देणें हीं होत. यापैकीं वजनें नाण्यांवरील सर्वमान्य पुस्तकांप्रमाणें ग्रेनमध्यें घ्यावयास पाहिजे होतीं; पण येथील बाजारांत मिळणारीं ग्रेनचीं वजनें इतकीं ओबडधोबड व ढोबळ होतीं कीं, त्यांच्या खरेपणाविषयीं माझी खात्री पटेना. तेव्हां सुरक्षित मार्गानें जाण्याची चूक करणें बरें, असें वाटून मी ग्रॅमचीं वजनें वापरलीं व सेंटिमीटरमध्यें लांबीरुंदीचीं मापें घेतलीं. नंतर एक कच्चा कॅटलॉग तयार केला. पण पुढें मंडळ पाहण्यास येणाऱ्या लोकांना नाणीं दाखविण्याच्या गडबडींत त्यांची व्यवस्था पार बिघडून गेली. याच अवधींत सुमारें ५० नाणीं मंडळसंग्रहांत नव्यानें दाखल झालीं. यामुळें जवळ जवळ निम्या नाण्यांचीं वजनेंमापें पुन्हां घ्यावीं लागलीं. तेव्हां या कॅटलॉगमध्यें दिलेलीं वजनेंमापें ग्रॅमसेंटिमीटरमध्यें आहेत. मात्र ताळा पाहणारासाठीं ग्रॅमचे ग्रेन व सेंटिमीटरचे इंच करण्याचीं कोष्टकें या पुस्तकांत देऊन ठेविलीं आहेत.

हा कॅटलॉग तयार करतांना कोणतीं नाणीं यांत यावींत हा प्रश्न उत्पन्न होऊन त्याजविषयीं सामान्यतः असें धोरण ठेवण्यांत आलें कीं, इ स. १८५७ पर्यंतचीं सर्व नाणीं सामील करावयाचीं व पुढील काळांतील ओळखण्यास अवघड असलेलींच फक्त घ्यावयाचीं. या धोरणानुसार प्रस्तुत कॅटलॉगमधील नाण्यांची निवड केली आहे.

ज्या नाण्यांची टांकसाळ सांगतां आली त्यांची टांकसाळीची जागा सांगितली आहे. ज्यांची ठाऊक नाहीं त्यांची जागा रेघेनें दाखविली आहे. विशिष्ट टांक-

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

साळींचें विशिष्ट चिन्ह ठरलेलें असे. अशा खुणा आणि १,२,३,४,५,६,७ अशा टिंबांचे समुदाय यांच्या आकृतींचें स्वतंत्र पान दिलें आहे. त्यावरून नाणीं ओळखण्यास फार मदत होईल अशी खात्री आहे. (पहा परिशिष्ट ई)

कोणतें नाणें कोणत्या राजाचें आहे हें त्या नाण्याचें वर्णन देतांनाच सांगावयास हवें; पण या संग्रहांतील नाणीं अगदींच थोडीं असल्यानें छापण्याच्या सोयीच्या दृष्टीनें तसें न करतां ज्यांचीं नाणीं आहेत त्यांचें नांव, वंश, काल व नाण्यांचा क्रमांक यांची स्वतंत्र अनुक्रमणिका दिली आहे.

नाण्याची पाठ व पोट यांचीं वर्णनें देतांना वामसुख, सव्यमुख, बिंदुयुक्त, बिंदुमय असे कांहीं पारिभाषिक शब्द वापरले आहेत त्यांचा अर्थ नीट समजून घ्यावा. पाठ व पोट यांमध्यें लिहिलेला मजकूर किंवा वर्णन प्रत्येक नाण्याच्या बाबतींत पूर्णपणें लागू पडेल असें मात्र कोणी समजूं नये. एकाद्या नाण्याच्या पाठीपोटांचें पूर्ण वर्णन करणें किंवा मजकूर सांगणें यासाठीं त्याच नाण्याच्या जातीचीं अनेक नाणीं एकत्र करावीं लागतात व त्यावरून एका नाण्याचें वर्णन पूर्णपणें निश्चित ठरवितां येतें. केवळ प्रस्तुत संग्रहांतील नाण्यांच्या आधारानेंच वर्णन करूं गेलों असतों तर बऱ्याच नाण्यांचीं वर्णनें अपुरींच राहिलीं असतीं. तसें होऊं नये यासाठीं नाण्यांवरील सर्वमान्य पुस्तकांतून जरूर तेथें वर्णनें किंवा मजकूर उतरून घेतला आहे.

नाण्यांवरील फारसी अक्षरांचें एका विशिष्ट पद्धतीनें लिप्यंतर केलें असून तिचा खुलासा पुढें दिला आहे. फारसी विशेषतः अरबी शब्दांचें लिप्यंतर करतांना एक दोष न कळत माझ्या हातून झाला असण्याचा संभव आहे. तो दोष ज्या शब्दांचे निश्चित उच्चार ठाऊक नाहींत असे शब्द लिप्यंतरित करतांना त्यांतील व्यंजनांना जोडले गेलेल्या अ, इ, उ, ए, ऐ, ओ, औ ह्या स्वरांत आढळणारा आहे. या स्वरांचा बोध होण्यासाठीं फारसी किंवा अरबी लिपींत खुणा आहेत; पण नाण्यांच्या बाबतींत बहुतेक ठिकाणीं त्या गाळलेल्या असल्यामुळें फारसी किंवा अरबी शब्दांचे उच्चार कसे ठरवावयाचे हा मोठा अवघड प्रश्न नेहमीं माझ्या पुढें आला. विशेषतः अल या उपपदाचे विभक्तिसंबंधावरून अल, इल, उल असे तीन उच्चार होत असल्यामुळें कोणता उच्चार कोठें लिहावा हें अरबी भाषा येत नसल्यानें मला ठरवितां आलें नाहीं. यामुळें एकाद्या ठिकाणीं उच्चारामध्यें ढिलेपणा आला असण्याचा संभव आहे. पण या पुस्तकाच्या शेवटीं मुसलमानी व इतर नाण्यांवरील फारसी अरबी मजकूर फारसी लिपींत देऊन संभाव्य दोषाची भरपाई केली आहे. यामुळें नाण्यांचा अभ्यास करणारांची व ज्यांना फारसी लिपी थोडी येत असेल त्यांची पुष्कळ सोय होणार आहे. अल या उपपदापुढें ते, से, दाल, ज़ाल, रे, झे, सीन, शीन, स़ाद, ज़ाद, तोय, ज़ोय, लाम,

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नून हीं अक्षरें आलीं असतां अल मधील ल चा उच्चार या अक्षरांच्या उच्चारांशीं एकरूप होत असतो. मी अल चा उच्चार देतांना हा नियम पाळला आहे.

हें पुस्तक तयार करतांना ईलियटः Coins of Southern India, प्रो. रॅप्सनः Indian Coins, कलकत्त्याच्या इंडियन म्यूझियमच्या नाण्यांच्या कॅटलॉगचे २, ३, ४ हे व्हॉल्यूम्स, न्यूमिस्मॅटिक क्रॉनिकल हें नियतकालिक, पंजाब म्यूझियमच्या नाण्यांच्या कॅटलॉगचा २ रा व्हॉल्यूम व इतर पुस्तकें यांचा फार उपयोग झाला असल्यामुळें त्यांचा येथें उल्लेख करणें आवश्यक आहे.

२

मंडळांतील नाण्यांवरून सुचणारे विचार सांगण्यापूर्वी मंडळांतील नाण्यांची वर्गवारी सांगतों. ती अशी— प्राचीन २३, दिल्लीचे सुल्तान ४५, बहमनी २५, आदिलशाही १७, मुगल २६, म्हैसूर ११, निजामुल्मुकी ७, कंपनी २३, शिवशाही व पेशवाई ४४ आणि इतर ७. अर्वाचीन व ओळखूं न आलेलीं अशीं १५० नाणीं आहेत; पण त्यांत महत्त्वाचीं फारच थोडीं असावींत. शिवाय २५० शिवराई पैसे, १२५ कंपनीचे पैसे व तितकेच फारसी अनोळखी पैसे आहेत. आतां या वर्गीकरणापैकीं कांहींचें वैशिष्ट्य थोडक्यांत पुढें देतों.

प्राचीनः— क्र. १ ते ४ या नाण्यांवर निरनिराळीं चिन्हेंच फक्त दिसत आहेत. यामुळें त्या नाण्यांच्या विषयीं विशेष कांहीं सांगतां येण्यासारखें नाहीं. क्र. ५ व ६ हीं दोन्ही नाणीं वस्तुतः नहपान क्षत्रपाचीं; पण त्यांपैकीं क्र. ६ च्या मुखोट्यावर उज्जयिनी चिन्ह असल्यामुळें तें गौतमीपुत्र २ रा शातकर्णि याचें सिद्ध होत आहे. या गौतमीपुत्र शातकर्णीनें इ. स. १२४ च्या सुमारास नहपानाचा पराभव करून अशा प्रकारचीं नाणीं चालूं केलीं होतीं. क्र. ९ व १० हीं इराणमध्यें राज्य करणाऱ्या सास्सान वंशांतील राजांचीं आहेत. हे राजे व या राजांच्या कालीं इराणमधील लोकही झरतुष्ट्री धर्माचे असल्यानें त्यांच्या अनेक नाण्यांवर अग्निकुंडाची आकृति सांपडते. या राजांच्या नाण्यांवर लांब व चिंचोळे मुखोटे काढलेले असतात. क्र. १०-१३ ह्या नाण्यांना जरी गधियाका पैसा हें नांव असलें तरी ते पैसेही नव्हत आणि त्यावर गाढवाचें चित्रही नाहीं. सास्सानी नाण्यांची नक्कल करतां करतां त्यांस प्रस्तुतचें विकृत स्वरूप प्राप्त झालें आहे. क्र. १४-१६ हीं नाणीं इराणांत राज्य करणाऱ्या ग्रीक राजांचीं आहेत. या नाण्यांवरील मुखोटे व सास्सानी नाण्यांवरील मुखोटे यांच्या घडणींत जितकें साम्य दिसतें तितकें ग्रीक नाण्यांवरील मुखोट्यांच्या घडणींत दिसत नाहीं (पहा क्र. १७,१८). हिंदुस्थानांत राज्य करणाऱ्या या ग्रीक राजांचे मुखोटे प्रमाणशीर काढले असल्यामुळें जास्त चांगले व स्वाभाविक दिसतात. शिवाय ग्रीक राजांच्या डोक्यांना जे टोप घातले आहेत त्यामुळें त्या मुखोट्यांस जास्त शोभा येते. सास्सानी नाण्यांवरील मुखोट्यांना लांब मुकुट अस-

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

त्यामुळें ते मुखोटे प्रमाणाबाहेर दिसतात. या सर्व नाण्यांवर पहलवी, ग्रीक वगैरे भाषांत व तत्कालीन लिपींत लिहिलेला मजकूर असतो.

दिल्लीचे सुलतान:-गियासुद्दीन तुगलकच्या नाण्यांपैकीं तीन नाणीं हि. ७२६ (क्र.३३) व ७२७ (क्र. ३४, ३५) या वर्षांचीं आहेत. गियासुद्दीन तुगलक हि. ७२५ मध्यें वारल्याचें निश्चित आहे. तसेंच त्याच्या मागून येणारा मुहम्मद तुगलक याचीं नाणींही हि. ७२५ पासूनचीं सांपडतात; तेव्हां या दोन्ही गोष्टींचा मेळ कसा घालावयाचा ही शंका आल्यास असें उत्तर देतात कीं, गियासुद्दीन मेला व मुहम्मदानें आपल्या नांवानें नाणीं पाडण्यास सुरवात केली तरी गियासुद्दीनच्या नांवानें नाणीं पाडण्याचें काम अजीबात बंद केलें गेलें नसावें आणि म्हणूनच हि. ७२५, ७२६ व ७२७ या तीन वर्षांमध्यें दोघांच्याही नांवानें पाडलेलीं नाणीं सांपडतात.

बहमनी— हीं नाणीं जरी थोडींच आहेत तरी महत्त्वाचीं आहेत. विशेषतः क्र. १, १६, २१–२५ हीं नाणीं दुर्मिळ आहेत असा माझा कयास आहे.

आदिलशाही–या संग्रहांतील आदिलशाही नाण्यांस लारी ही संज्ञा आहे. मराठी कागदपत्रांतून लारी दाभोळी व लारी हुरमुजी अशा दोन प्रकारच्या लाऱ्यांचा उल्लेख येतो. लारी हें नाणें प्रथमतः लार या ठिकाणीं पाडलें जात असे; नंतर तें नाणें आपल्या इकडे दाभोळास पाडलें जाऊं लागलें; आणि त्यावरून त्यास लारी दाभोळी हें नांव पडलें. लारी हुरमुजी या शब्दाचा विचार करितांना ज्याप्रमाणें दाभोळी हा शब्द लारी पाडली गेली तें स्थान दाखवितो त्याप्रो हुरमुजी हा शब्दही स्थानच दाखवितो अशी कल्पना केली तर त्यांत मला वाटतें कांहीं वावगें नाहीं. हुरमुज हें होर्मझ्द किंवा अहुरमझ्द या शब्दाचें अपभ्रष्ट रूप असावें. तेव्हां हुरमुजी लारी म्हणजे होर्मझ येथें पाडलेली लारी असा अर्थ होईल. हीं दोन्ही ठिकाणें इराणच्या आखाताच्या किनाऱ्यावर आहेत. लारीविषयीं दुसरी ध्यानांत ठेवण्याची गोष्ट म्हणजे तीवरील मजकूर. या संग्रहांत ज्या लाऱ्या आहेत त्या सर्वांवर एका बाजूस 'सुल्तान अली आदिलशाह' व दुसऱ्या बाजूस 'जर्ब लारी दाबु (बो)ली[1] सनह–'असा मजकूर आहे. कांहीं लाऱ्यांवर आदिल ऐवजीं आदाल असा शब्द आहे. कित्येक लाऱ्यांवर शाह शब्दापुढें एक उभी रेघ तर कित्येकांवर तीन उभ्या रेघा आहेत. एकीवर जर्ब ह्या शब्दांतील बे वर तारा आहे.

---

१ डॉ. टेलर यांनीं **दाबुली** या वाचनाऐवजीं **दान्गे** असें वाचन सुचवून त्याचा Tanga या नाण्याशीं संबंध असावा असें ध्वनित केलें आहे. पण Tanga हें पोर्तुगीज नाणें आहे हें त्यांनीं दिलेल्या उताऱ्यावरूनच सिद्ध होत आहे (पहा J. A. S. B. 1910 Numismatic suppliment p. 681. मला वाटतें Tanga हें नाणें टंक या नाण्यावरून बनविलेलें असावें. हल्लींही पोर्तुगीज नाण्यांपैकीं कांहींवर हा शब्द आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

या लाऱ्यांचा प्रचार कोंकणांतच विशेष असला तरी तो फार पूर्वींपासून आहे असें दिसतें. इ. स. १९२०–२१ सालच्या वेस्टर्न सर्कलच्या ऑर्किऑलॉजीच्या प्रोग्रेस रिपोर्टमध्यें रत्नागिरी जिल्ह्यांत सांपडलेल्या लाऱ्यांच्या एका ठेव्याची माहिती दिली आहे. तीवरून असें दिसतें कीं, त्यांतलि सर्वांत जुनी लारी हि. ९६४ (श. १४७८–७९ इ. १५५६–५७) ची असून कित्येकांवर फारसी ऐवजीं कानडी (?) मजकूर आहे. तसेंच कित्येकांवर कलिमाचा मजकूर अथवा तहमास्प, बहादुर, ह्री व ५ इमाम किंवा ४ खलीफा यांचीं नांवें आहेत (पृ. ५८). डॉ. टेलर यांनीं ज्या पोर्तुगीज लेखकाचा उल्लेख केला आहे त्याचा काल इ. १५२५ हा आहे. श.१४१० (इ. १४८८)च्या एका मराठी कागदांत लारीचा उल्लेख असून तेथें लारी शब्दामागें दाबुली किंवा हुरमुजी हें विशेषण नाहीं (सप्तम संमेलन वृत्त पृ. १९४).

मुगल–मंडळांतील मुगल नाण्यांमध्यें दोन प्रकार आहेत. पैकीं एक प्रकार खुद्द मोगल अधिकाऱ्यांनीं पाडलेल्या नाण्यांचा; आणि दुसरा प्रकार फ्रेंच, इंग्रज वगैरेनीं मोगलांच्या नांवानें पाडलेल्या नाण्यांचा. या दोन प्रकारांपैकीं गुणाच्या दृष्टीनें पाहिलें तर कंपन्यांनीं पाडलेलीं नाणीं जास्त सुबक, रेखीव व स्पष्ट अशीं आहेत. त्या मानानें देश्य नाणीं भिकार दिसतात. हिंदुस्थानच्या प्राचीन काळांत ज्याप्रमाणें ग्रीक वगैरे परकी लोकांचीं नाणीं जास्त सुबक व रेखीव होतीं त्याप्रमाणें यावेळींही परस्थांनीं पाडलेलीं नाणीं जास्त चांगलीं असावींत हा योगायोगच म्हणावयाचा. दुसऱ्या प्रकारांतील शाह आलमच्या नाण्यांच्या बाबतींत एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, ज्या टांकसाळी प्रत्यक्ष मोगली अधिकारांत नव्हत्या किंवा दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे ज्या टांकसाळी अयोध्येचे नबाब, इंग्लिश किंवा फ्रेंच कंपन्या, मराठे सरदार यांच्या ताब्यांत असत त्या टांकसाळींत पाडलेल्या नाण्यांवरील जुलूस सनाचे व हिजरी सनाचे आंकडे जुळत नाहींत. उदाहरणार्थ पुढील नाणीं पहा.

	मुगल क्रमांक	जुलूस	हिजरी	टांकसाळ
(१)	१५	१९	१२०२	मुर्शिदाबाद (इंग्लिश)
(२)	१६	१७ व ४९	१२२२	मुहम्मदाबाद बनारस ,,
(३)	१७	४६	१२१५	सूरत (इंग्लिश)
(४)	२५	४३	१२२१	अर्काट (फ्रेंच)

शाह आलम हि. ११७३ मध्यें राज्यावर बसला असल्यामुळें जु. १९ ला ११९१–९२, जु. ४९ ला १२२०–२१, जु. ४६ ला १२१८–१९ व जु. ४३ ला १२१५–१६ हीं वर्षें येतात. अर्थात् या चारही उदाहरणांत कालाचे उल्लेख मिळते नाहींत. पैकीं ३ नाण्यांवरील हिजरी वर्षाचा आंकडा जुलूसच्या मानानें जास्त आहे. मुगल क्र. १५ हें नाणें मुर्शिदाबाद टांकसाळीचें आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

इ. स. १७६५ (जु. ६ हि. ११७८) पासून या टांकसाळीची व्यवस्था ईस्ट इंडिया कंपनीकडे गेल्यामुळें पुढील कालांतील नाण्यांवरील जुलूस व हिजरी हे जुळते असणें शक्य दिसत नाहीं. या नाण्यांवर १९ जुलूसचा जो आंकडा आला आहे तो ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यवस्थेंतील एकादी पायरी दर्शवीत असावा. क्र. १६ चें नाणें ईस्ट इंडिया कंपनीनें तिजकडे जु. १७ मध्य मुहम्मदाबाद् बनारस टांकसाळीची व्यवस्था आल्यानंतर पाडलेला रुपया आहे. शाह आलम हि. १२२१ मध्यें जुलूसच्या ४९ व्या वर्षी वारल्यानंतर कंपनीनें १२२९ पर्यंत शाह आलमच्या नांवानें रुपये पाडले आणि त्यांवर १७४९ हे आंकडे घालून शिवाय नाणें पाडल्याचें वर्ष दाखविणारा हि. सनाचा आंकडा घातला आहे. हि. १२१५ मध्यें ईस्ट इंडिया कंपनीस सुरतेस बाद्शहाच्या नांवानें नाणीं पाडण्याचा अधिकार मिळाल्यावर जे रुपये पाडले गेले त्यांपैकीं क्र. १७ हा आहे. जु. ४६ (=हि. १२१८–१९) सालापर्यंत या नाण्यांच्या बाबत निश्चितपणा आला नव्हता. तो या सालीं आल्यामुळें अशा प्रकारच्या नाण्यांवर हि. १२१५ व जु. ४६ असे दोन्ही कालोल्लेख कायम ठेवण्यांत आले. हें नाणें मुंबईस पाडलें जाई किंवा सुरतेस, याविषयीं मतभेद आहे. क्र. २५ हें नाणें त्याजवरील चंद्रकलेच्या खुणेवरून फ्रेंच कंपनीचें आहे हें उघड आहे. त्याजवरील १२२१ हा हिजरी आंकडा शाह आलमच्या मरणाचें वर्ष दाखवितो. इ. म्यू. कॅ. व्हा. ४ मध्यें इ. १७९३ ते १८०२ पर्यंत पांडेचरी इंग्रजांच्या ताब्यांत असल्यामुळें त्या काळांत फ्रेंच कंपनीनें असले रुपये पाडले नाहींत असें विधान आहे (पृ. १३०). या नाण्यावर जुलूस ४३ चा एक कालोल्लेख असून तो इ. १७९३–१८०२ च्या दरम्यान पडत आहे. तेव्हां या नाण्यावर हा जुलूसचा उल्लेख कसा आला ? इ. स. १८१७ नंतर या कंपनीनें जे रुपये पाडले त्यांवर हि. १२२१ व जु. ४५ हे दोन कालोलेख असतात असेंही वरील पुस्तकांत विधान आहे. तेव्हां या नाण्याची संगति कशी लावावयाची ? पं. म्यू. कॅ. मध्यें हुबेहूब क्र. २५ प्रमाणें असलेलें एक नाणें आहे (व्हॉ. २ क्र. ३१७१). हें नाणें ज्याप्रमाणें फ्रेंच कंपनीनें, त्याप्रमाणें क्र. १०–१४ हीं नाणीं ईस्ट इंडिया कंपनीनें पाडलेलीं आहेत. यांपैकीं क्र. १०, ११ चार आणे किंमतीचीं, क्र. १२ दोन आणे किंमतीचें, आणि क्र. १३,१४ हीं दोन नाणीं १ आणा किमतीचीं आहेत असें समजण्यास हरकत नाहीं.

म्हैसूर–या संग्रहांत या नांवाखालीं दिलेल्या नाण्यांपैकीं क्रमांक १ ते ९ हीं नाणीं टिपूचीं आहेत. टिपूच्या नाण्यांच्या बाबतींत २।३ गोष्टी ध्यानांत ठेवल्या पाहिजेत. पैकीं पहिली गोष्ट म्हणजे त्याच्या नाण्यांवर आढळणारी मव्लूदी कालगणना. या कालगणनेची सुरवात मुहम्मद पैगंबराच्या पलायनापासून न

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

करतां जन्मापासून केलेली असून वर्ष चांद्रसौर म्हणजे जोड मानाचें अर्थात अधिक महिना ज्यांत येतो असें आहे. याचा आरंभही चैत्र शुद्ध प्रतिपदेपासूनच होत असे. या बरोबरच टिपूनें ६० वर्षांचें संवत्सर चक्र व बारा महिन्यांचें चक्र यांपैकीं प्रत्येकास राज्याभिषेकाच्या पहिल्या ४ वर्षापर्यंत अबजद पद्धतीचीं व पुढें अवतस् पद्धतीचीं अरबी नांवें देऊन तीं या नवीन तऱ्हेच्या कालगणनेंत सामील करून टाकिलीं. या नावांना विशेष अर्थ नसून तीं संवत्सराची व महिन्याची संख्याच दाखवितात. तसेंच मव्लूदी सनाचे आकडेही डावीकडून उजवीकडे लिहीत जाण्याऐवजीं फारसी अक्षरांप्रमाणें उजवीकडून डावीकडे लिहिण्याची प्रथा यानें नव्यानें सुरू केली. या संग्रहांतील म्हैसूर क्र. २ वर मात्र ही नवीन पद्धत अमलांत आणलेली दिसत नाहीं. स्वतःच्या राज्याभिषेकाचें वर्ष आंकड्यांत न सांगतां अरबी अक्षरांनीं दर्शविण्याचाही प्रघात त्यानें मव्लूदी १२२४ त सुरू केला होता. या सर्व गोष्टी दर्शविणारीं नाणीं प्रस्तुतच्या संग्रहांत आहेत. उ. म्हैसूर क्र. १ हेंच नाणें घ्या. याच्या पोटावर ' साल सारा सनह ६१२१ ' असे शब्द आहेत. यांपैकीं सारा हें मव्लूदी १२१६ या वर्षाशीं जुळणाऱ्या संवत्सराचें नांव असून ६१२१ हा आंकडा १२१६ ही संख्या दाखवीत आहे. याच नाण्याच्या पाठीवरील ' सख ' हा शब्द ज्या संवत्सरांत टिपू गादीवर आला त्याचें नांव असून बहारी हें नांव ज्यांत तो गादीवर बसला त्या महिन्याचें आहे. म्हैसूर क्र. ७ व ९ यांवर अनुक्रमें १२२४ व १२२६ हीं मव्लूदी वर्षें असून शिवाय अलिफ व ते अशीं दोन अरबी अक्षरें आहेत. यांचा अर्थही १२२४ व १२२६ असाच होत आहे.

शिवशाही व पेशवाई--या संग्रहांत शिवाजीच्या वेळचीं सोन्याचीं व रुप्याचीं आणि पेशवाईतील सोन्याचीं नाणीं नाहींत. पण इतरत्र शिवाजीचीं सोन्याचीं नाणीं सांपडलेलीं असून तीं नाणीं लोकांपुढें आणण्याचा प्रथमचा मान वेस्टर्न सर्कलच्या आर्किऑलॉजीच्या खात्याला दिला पाहिजे. या सर्कलच्या १९१८–१९ च्या प्रोग्रेस रिपोर्टांत शिवाजीच्या होनाची माहिती आली आहे (पृ. ४८). त्यानंतर मंडळांतही २।३ वेळां शिवाजीचे होन दाखविण्यांत आले आहेत. शिवाजीचे होन व तांब्याच्या शिवराया यांवर कालाचा निर्देश करीत नसत असें मंडळांत शिवकालीन ज्या २५० शिवराया आहेत त्यावरून म्हणतां येतें.

पेशवे, शिंदे, होळकर, वगैरेंचीं नाणीं मोगल बादशहाच्या नांवानें पाडलेलीं आहेत. शिवाजी व उत्तर कालीन मराठे यांमध्यें नाण्यांच्या बाबतींत एक महत्त्वाचा फरक दिसतो. शिवाजीनें स्वतंत्र राज्य स्थापिलें आणि तद्दर्शक तांब्याचीं व सोन्याचीं नाणीं पाडिलीं. पेशवे व त्यांच्या हाताखालील सरदार यांनीं मराठ्यांचें राज्य सबंध हिंदुस्थानभर करण्याची उमेद धरली. पण त्यांपैकीं बहुतेकांना स्वतंत्र नाण्यांच्या योगानें आपलें स्वतंत्र अस्तित्व दाखविण्याची गरज भासूं नये हें आश्चर्य होय.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पेशवाईंत स्वतंत्रतेची काय कल्पना होती कोणास माहीत. तसेंच मोगल बादशहाविषयीं मराठ्यांच्या मनांत कोणत्या भावना वसत होत्या हेंही नीट समजत नाहीं. पण दिल्लीहून स्वराज्याच्या सनदा आणणें व महादजी शिंद्यांनीं बादशहाकडून पाठविलेल्या वकीले मुत्लकच्या वस्त्रांचा पेशव्यानें अभिमानानें स्वीकार करणें या दोन गोष्टींवरून अनुमान काढावयाचें तर असें म्हणावें लागेल कीं, शिवाजीच्या कृतींत स्वतंत्रतेची भावना जशी स्पष्ट रीतीनें प्रतीत होते तशी पेशवे व इतर सरदार यांच्या कृतींत व्यक्त होत नाहीं. उलट मोगल बादशहांचें सार्वभौमत्व मानण्यांत पेशवे व सरदार भूषण समजत होते कीं काय अशी शंका येते. शिवाय ज्या मुळें पेशवे व शिंदे, होळकर, भोसले वगैरे सरदार एकाच मराठी राज्याचे घटक होते हें समजून येईल असें चिन्ह यांपैकीं एकाच्याही नाण्यांवर आढळून येत नाहीं. बहुतेकांनीं आपल्या कुलदेवतेचें नांव, किंवा कुलाचें चिन्ह यांपैकीं कांहींतरी एक आणि शाह आलम किंवा इतर मोगली बादशहा यांचीं नांवें नाण्यांवर घातलीं आहेत. तेव्हां नाण्यांवरूनच अनुमान काढावयाचें तर या लोकांमध्यें आपण सर्व एकाच मराठी राज्याचे नोकर ही भावना नव्हती असें म्हणावें लागतें.

पेशव्यांनीं स्वतःच्या देखरेखीखालीं ज्या टांकसाळी ठेवल्या होत्या त्यांत पाडलेल्या व या संग्रहांत असलेल्या रुप्याच्या नाण्यांत ४५ प्रकार दिसतात. त्यांपैकीं **एक प्रकार** म्हणजे मुहियाबाद पूनह हें टांकसाळीचें नांव धारण करणाऱ्यांचा. त्यांतही दोन जाती आहेत. पैकीं एकीवर फक्त दोन्ही बाजूस फारसी मजकूर असून दुसरीच्या पाठीवर फारसी मजकुराबरोबर १२३२, १२४२ अशा सारखा नागरी आंकडा आहे. दुसऱ्या जातीच्या रुपयांची घडण व अक्षरवटिका हीन दर्जाची असल्यामुळें दोन्ही जातीचे रुपये पुण्याच्या टांकसाळींतच पाडले गेले आहेत कीं नाहींत याविषयीं शंका उत्पन्न होते. पेशवाई रुपयांचा **दुसरा प्रकार** क्र. १५ च्या स्वरूपावरून कळून येतो. या प्रकारच्या रुपयांवर पहिल्या प्रकारच्या रुपयांवर जो फारसी मजकूर असे तोच जवळ जवळ असून शिवाय त्याच्या जोडीस एका बाजूवर 'श्री गणपति' व दुसऱ्या बाजूस 'श्री पंत प्रधान' असा नागरी मजकूर असे. अशा प्रकारचे रुपये जरी थोडे सांपडतात तरी ते अगदींच दुर्मिळ नाहींत हें अशाच एका नाण्याचें वर्णन वेस्टर्न सर्कलच्या आर्किऑलॉजीच्या इ. स. १९१८–१९ सालच्या रिपोर्टांत केलें आहे त्यावरून दिसून येईल. पेशवाई रुपयांचा **तिसरा प्रकार** म्हणजे चांदवडी रुपये होत. यावर मुगल क्र.१५ प्रमाणेंच जवळ जवळ फारसी मजकूर असून टांकसाळीचें नांव मात्र चांदोर हें असे. टांकसाळीची खुण बाणमुख ही होती. यांच्या वरील मजकुरांत व घडणींतही स्पष्ट भेद दिसत असल्यामुळें हे सर्व एकाच टांकसाळींतील आहेत कीं

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नाहींत याविषयीं शंका येते. **चौथा प्रकार** म्हणजे अंकुशी रुपयांचा. अंकुश ही हे रुपये ज्या टाकसाळींत पाडले जात तिची खूण आहे. हे रुपये वाई व बागलकोट येथें पाडले जात अशी समजूत आहे. यांतही पहिल्या प्रकाराप्रमाणेंच दोन जाती आहेत. पैकीं एकीवर निव्वळ फारसी मजकूर असून दुसऱ्या जातीच्या रुपयांच्या पाठीवर फारसी मजकूर व शिवाय नागरींत १२३१,१२३३ अशा सारखा आंकडा असतो. दुसऱ्या प्रकारचे रुपये कदाचित् बागलकोट येथें पाडले गेले असतील. पण पहिल्या प्रकारचे रुपये पुणें येथे पाडले गेले असावेत असा क्र. २४ वरून संशय येतो. या शिवाय आणखी एका प्रकारचे रुपये मंडळसंग्रहांत आहेत. यांजविषयीं निश्चित माहिती अजून मिळत नसल्यानें ते कॅटलॉगमध्यें समाविष्ट केलेले नाहीत. पण त्यांचें वर्णन येथें देणें युक्त आहे. या नाण्यांच्या पोटाच्या बाजूवर '**आलम गाझी** बादशाह-[जलाल-उ] द्-दीन सिक्कह ' येवढा फारसी मजकूर स्पष्ट असून शिवाय इंग्रजींत १८१९ हा आंकडा आहे. पाठीवरचा फारसी मजकूर मैमनत मानूस अशा सारखा दिसत आहे. असे दोन रुपये संग्रहांत असून त्यांचीं वजनें व मापें अनुक्रमें १०.०२० व २.११ आणि १०.९५२ व २.११ अशीं आहेत. हे जत संस्थानांत सांपडले आहेत. घडणीचा विचार करतां हे देशी टांकसाळींत पण इंग्रजी राजवट सुरू झाल्यावर पाडलेले दिसतात.

पेशवाईंतील तांब्याचीं नाणीं शिवराई पैसे किंवा ढब्बू याप्रमाणेंच असून त्यांवर १२३४, १२४४ असा नागरी आकडा व कांहीं चिन्हें येवढ्याच गोष्टी काय त्या जास्त होत्या असें वाटतें.

नागपंचमी शक १८५५ **गणेश हरी खरे.**

---

१ मी नुकताच कऱ्हाड येथें गेलों असतां असल्या जातीच्या एका रुपयावर १२२४ हा फारसी आंकडा असल्याचें आढळलें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लिप्यंतराची पद्धत.

अ = ا किंवा ء

ब = ب

प = پ

त = ت

स़ = ث

ज = ج

च = چ

ह = ح

ख = خ

द़ = د

ज = ذ

र = ر

झ = ز

झ = ژ

स = س

श = ش

स = ص

ज़ = ض

त = ط

ज़ = ظ

अ = ع

ग = غ

फ = ف

क = ق

क = ک

ग = گ

ल = ل

म = م

न = ن

ऊ, ओ, औ, व = و

ह = ہ

ई, ए, ऐ, य = ی

संक्षेप

आ०=आदिलशाही

इ. म्यू. कॅ. व्हा.=इन्डियन म्यूझियम कॅटलॉग व्हॉल्यूम्

कं०=कंपनी

क्र०=क्रमांक

चि०=चिन्ह

चौ०=चौकोन

जु०=जुलूस

नाग०=नागरींत

नि०=निजामुल्मुल्की

पृ०=पृष्ठ

प्र०=प्रतिमापत्र

प्रा०=प्राचीन

प्रो=प्रमाणें

बिंदु०=बिंदुयुक्त, बिंदुमय

बि०=बिलन Billon

म०=मव्लूदी

मु०=मुघल

म्है०=म्हैसूर

शि०=शिवशाही व पेशवाई

सु०=दिल्लीचे सुलतान

हि०=हिजरी

है०, हैदरा०=हैदराबाद

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

अनुक्रमणिका

१-२३ प्राचीन १
१- २ देश्य १
३ आंध्र
४ कुरुंचर् (इ. स. २ रें किंवा ३ रें शतक) १
५ क्षत्रप नहपान (इ. स. ७८ ते १२४) १
६ आंध्र गौतमीपुत्र २ रा शातकर्णि (इ. स. १०६-१३०) १
७ त्रैकूटक इंद्रदत्तपुत्र दह्लसेन (सु. इ. ४५६) १
८ श्रीमत्साहसमल्ल (इ. १२००-१२०२) २
९ इराणमधील सास्सान वंशी १ ला आर्देशीर (इ. २२६-२४०) २
१० „ „ „ „ शापूर (इ. २४०-२७१) २
११-१३ गधिया पैसा २
१४-१५ ग्रीक Elymais वंशी १ ला Orodes (इराणमध्यें राज्य) ३
१६ „ „ Phraates („) ३
१७ ग्रीक Apollodotus (बॅक्ट्रिया व हिंदुस्थान इ.पू.१५६-१४०) ३
१८-२३ अनोळखी ३

१-४५ दिल्लीचे सुलतान
१ खलजी जलाल-उद-दीन (हि. ६८९-६९५) ४
२-१३ " अला-उद-दीन (हि. ६९५-७१५) ४
१४-१७ " कुत्ब-उद-दीन (हि. ७१६-७२०) ५
१८-४० तुग्लक गियास्-उद-दीन (हि. ७२०-७२५) ६
४१-४५ " मुहम्मद (हि. ७२५-७५२) ७

१-२५ बहमनी ८
१ अला-उद-दीन हसन (हि. ७४८-७५९) ८
२ फीरूझ शाह (हि. ८००-८२५) ८
३- ५ १ ला अहमद शाह (हि. ८२५-८३८) ८
६- ८ २ रा " " (हि. ८३८-८६२) ९
९-१२ ३ रा मुहम्मद शाह (हि. ८६७-८८७) ९
१३-१६ महमूद बिन मुहम्मद (हि. ८८७-९२४) ९
१७-२५ कलीम-उल्लह (हि. ९३२) ९

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

१–१७ आदिलशाही ११

१–२६ मुगल १२

१– ३ अक्बर (हि. ९६३–१०१४) १२

४–५ शाहजहान (हि. १०३७–१०६८) १२

६ औरंगझेब आलमगीर (हि. १०६८–१११८) १३

७–९ मुहम्मद शाह (हि. ११३१–११६१) १३

१०–१४ २ रा आलमगीर (हि. ११६७–११७३) १३

१५–२५ २ रा शाह आलम (हि. ११७३–१२०२) १४

२६ २ रा अक्बर (हि. १२२१–१२४३) १५

१–११ म्हैसूर १६

१–९ टिपू (हि. ११९७–१२१३) १६

१०–११ कृष्णराज वोडेयर (इ. १७९९–१८६८) १७

१–७ निजाम-उल-मुल्की १८

१–२३ कंपनी (ईस्ट इंडिया व युनायटेड ईस्ट इंडिया) १९

१–४४ शिवशाही व पेशवाई २३

१–४ छत्रपति शिवाजी २३

५ ,, राजाराम २३

६–७ इतर छत्रपति २३

८–२४ पेशवे २४

२५–२८ होळकर २५

२९–३२ होळकर शिवाजीराव २५

३३–३५ होळकर (संकीर्ण) २६

३६–३७ शिंदे २६

३८–४० गायकवाड खंडेराव २६

४०–४४ ,, मल्हारराव २७

१–७ इतर संस्थानें २७

१–६ नवानगर विभाजी (इ. १८५२–१८९५) २७

७ जयसिंघ जयनगर (ग्वालेर इ. १७९८–१८१८) २८

परिशिष्ट अ– (१) इंच व मिलिमीटर यांचें तुलनात्मक कोष्टक २९

(२) ग्रेन व ग्राम यांचें तुलनात्मक कोष्टक ३०

परिशिष्ट आ– टिपूची कालगणना पद्धति ३३

परिशिष्ट इ– नाण्यांवरील फारसी मजकूर ३५

परिशिष्ट ई– टांकसाळींचीं व इतर शोभेचीं चिन्हें आणि त्यांचा खुलासा ४२

प्राचीन.

क्रमांक	धातू	वजन	आकार	पोट.	पाठ.
१	पितळ	२·९६५	१·८२	चैत्य व आणखी कांहीं आकृती	अस्पष्ट आकृती
२	तांबें	२·९७५	१·३३	लहान उज्जयिनी चिन्ह व इतर आकृती	मोठें उज्जयिनी चिन्ह (= चिन्ह ३८३)
३	शिसें	१·५८	१·५	सव्यमुख हत्तीची अस्पष्ट आकृति	अस्पष्ट उज्जयिनी चिन्ह
४		२·१८	१·२६	दोन शिडें असलेलें जहाज	अस्पष्ट[1]
५	रुपें	३·३०	१·७१	मध्यभागीं सव्यमुख मुखोटा व भोंवतीं ग्रीक मजकूर	मध्यभागीं अधोमुख बाण, बिंदू व वज्र आणि भोंवतीं बिंदुमय कड्यांत ब्राह्मीमध्यें [रा]ञो **क्षहरातस नहपनस** हा व खरोष्ठींत **राञो क्षहरतस नहपनस** असा मजकूर[2]
६		३·९०	१·५३	मध्यभागीं सव्यमुख मुखोटा, त्यावर उज्जयिनी चिन्ह व भोंवतीं ग्रीक मजकूर	मध्यभागीं खालून वर चापयष्टि, चैत्य व वज्र आणि भोंवतीं खरोष्ठीमध्यें **रञो छत्रपस न** [**हपनस**?] हा व ब्राह्मीमध्यें **राजो क्षह** [......] हा मजकूर[3]
७		२·१८	१·३६	मध्यभागीं सव्यमुख राजाचा मुखोटा	मध्यभागीं चैत्य, त्याखालीं ३ टिंबें व भोंवतीं ब्राह्मीमध्यें **महरजद्रदत्तपुत्र परमवष्णव**

१ या नाण्याच्या पाठीवर सव्यमुख बकरा, त्यावर समुद्र, चंद्रकोर व उगवता सूर्य असावा असें वाटतें. पहा ईलियट पृ.१५२ व प्रतिमा-पत्र १ क्र. ३८. २. खरोष्ठी मजकूर नाण्यावर नाहीं. संदर्भावरून घेतला आहे. ३. हें नाणें मूळ नहपान क्षत्रपाचें होतें पण आंध्र गौतमीपुत्रानें त्यावर उज्जयिनी चिन्ह मारून आपलें बनविलें आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

क्रमांक	धातू	वजन	आकार	पोट.	पाठ.
८	तांबें	३·६६२	२·०५	सव्यमुख व डाव्या हातांत कमल असलेला उभा राजा, उजव्या हाताखालीं एक हत्यार, डाव्या पायापाशीं कमल व त्यावर पांच टिंबें. भोंवतीं बिंदुमय कडें	श्रमहरजद्रसन हा मजकूर सव्यमुख, डाव्या हातांत कमल असलेला बैठा राजा व त्याच्या उजव्या अंगास नागरींत: [श्री] मसा(त्सा) हस मल्ल[४]
९	पॉटिन	१२·८६२	२·८५	सव्यमुख, मुकुटधारी, दाढी असलेली अशी राजाची ऊर्ध्वांग प्रतिमा; भोंवतीं अस्पष्ट पहलवी मजकूर व त्याभोंवतीं बिंदुमय कडें.	मध्यभागीं अग्निकुंड, अग्निकुंडाच्या दोन्ही अंगास दोन अनोळखी आकृती; भोंवतीं अस्पष्ट पहलवी मजकूर व त्याभोंवतीं बिंदुमय कडें[५]
१०	तांबें	२·९४	२·४४	” अस्पष्ट	” अस्पष्ट
११	रुपें	४·२६५	१·५७	कुरूप, सव्यमुख राजाचा मुखोटा; भोंवतीं अस्पष्ट लेख व त्याभोंवतीं बिंदुमय कडें	डंबेलसच्या आकृती, षट्किरणी तारा व भोंवतीं बिंदुमय कडें[६]

४ याचीं शेंकडों नाणीं सांपडूनही त्यावरील मजकुरांपैकीं श्रीमत् या शब्दांतील श्रीचें विलक्षण रूप व त् चा सा ला जोडण्याची विलक्षण व अस्पष्ट पद्धती यामुळें पुष्कळ दिवस तीं ओळखूं आलीं नाहींत. त्यांवरील आकृती चोलांच्या नाण्यांवरून घेतल्या आहेत. पहा इलियट प्यारा ५५; रॅप्सन प्रतिमापत्र ५ क्र. १४, १५; इं. म्यू. कॅ. व्हॉ. १ पृ. ३३०. ५ पहा Valentine पृ. ३५ क्र. ६ व पृ. ३८ क्र. १२

६. याचें लौकिक नांव 'गधियाका पैसा' असें असून तें नाण्यावरील कुरूप आकृतिवरून पडलें असावें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

क्रमांक	धातू	वजन	आकार	पोट	पाठ
१२	रुपें	३·८४५	१·८०	क्र. ११ प्रमाणें	क्र. ११ प्रमाणें
१३		३·९१	१·६९	"	"
१४	तांबें	२·०१	१·४७	वाममुख, सतारक व चंद्रकलायुक्त मुकुटधारी, दाढी असलेली, राजाची ऊर्ध्वांग प्रतिमा; उजव्या बाजूस उलटा त्रिशूल; भोंवतीं बिंदुमय कडें[७]	सव्यमुख ऊर्ध्वांग प्रतिमा; भोंवतीं ग्रीक मजकूर; सर्वांभोंवतीं बिंदुमय कडें.
१५		२·०१	१·५९	"	तांदुळाच्या आकृती
१६		२·१८	१·३८	"	वाममुख व अर्धे पंख उघडलेला पक्षी आणि भोंवतीं बिंदुमय कडें
१७	रुपें	·८५	१·६२	सव्यमुख राजाचा अर्धपुतळा, भोंवतीं आणि खालीं ग्रीक मजकूर	वाममुख, डाव्या हातांत ढाल घेतलेली, उजव्या हातानें वज्र फेकणारी पल्लस(Pallas) देवता; मोनोग्राम=इं. म्यू. कॅ. व्हॉ. १ प्र. ७ क्र. १६८. भोंवतीं खरोष्ठींत **महरजस त्रतरस** व खालीं **अपलदतस** हा मजकूर[८]
१८	तांबें	३·८१८	१·८७	वाममुख, दाढी असलेली, टोप घातलेली राजाची ऊर्ध्वांग प्रतिमा	सव्यमुख घोड्याचें तोंड

७. पहा Catalogue of coins : Arabia, Mesopotemia and Persia in the British Museum प्रतिमा पत्र ३९ क्र. १६ प्र. ४० क्र. ७. प्र. ४१ क्र. २४ (?) ८ तुलनेसाठीं पहा. इं. म्यू. कॅ. व्हा. १ पृ. १८ क्र. १. संदर्भाशीं हें नाणें एकरूप नाहीं.

क्रमांक	धातू	वजन	आकार	पोट.	पाठ.
१९	रुपें	३·३२८	२·३०	सव्यमुख, ऊर्ध्वांग प्रतिमा; भोंवतीं ग्रीक मजकूर व कडें	मध्यें, बसलेली, एका हातांत पक्षी, दुसऱ्या हातांत भाला व तिसरा हात मोकळा अशी देवता. बाजूंस ग्रीक मजकूर व भोंवतीं कडें.
२०	तांबें	१·६२०	१·८७	सव्यमुख ऊर्ध्वांग प्रतिमा, भोंवतीं अस्पष्ट लेख व कडें	दोन उभ्या व्यक्तींच्या चारी बाजूंस ग्रीक लेख व कडें
२१		२·९६	१·४०	वाममुख ऊर्ध्वांग प्रतिमा	बिंदुमय कड्यांत वाममुख ऊर्ध्वांग प्रतिमा
२२		२·३१२	१·३८	सव्यमुख हत्तीचें डोकें ? भोंवतीं रेषायुक्त दुहेरी कड्यांत लेख	रेषायुक्त दुहेरी कड्यांत एक आकृती
२३		५·५६०	१·९२	मध्यें, टोप घातलेली, सव्यमुख ऊर्ध्वांग प्रतिमा व भोंवतीं बिंदुमय कडें	कांहीं आकृती

दिल्लीचे सुलतान.

क्रमांक	वजन	आकार	काल	पोट	पाठ
१ तांबें	४·४५०	१·६०		अस-सुल्तान-उल-अअज़म	जलाल-उद-दुनिया व अद-दीन
२ बि.	३·८५	१·५५		अस-सुल्तान-उल-अअज़म अला-उद-दु	दुहेरी कड्यांतः मुहम्मद शाह समासांत नागरीमध्यें: श्री:सुलतां अलावर्दी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

क्रमांक	वजन	आकार	काल	पोट	पाठ.
३ बि.	३·३५०	१·६३		निया व अद्–दीन "	"
४	३·३८८	१·६०	हि. ७१२	"	अबू–अल–मुज़फ्फर मुहम्मद शाह अस–सुल्तान ७१२
५	३·४०	१·५८	"	"	"
६	३·४७२	१·६०	"	"	"
७	३·४८०	१·७०	"	"	"
८	३·३४२	१·५८	७१३	"	" ७१३
९	३ ४१८	१·७०	"	"	"
१०	३·४९२	१·७०	७१४	"	" ७१४
११	३·३९०	१·६४	"	"	"
१२	३·३९८	१·५७	"	"	"
१३	३·४०८	१·६०	"	"	"
१४	३·४८८	१·६०	७१६	अस–सुल्तान–उल–अ अज़म कुत्ब–उद्–दु निया व अद्–दीन	अबू–अल–मुज़फ्फर मुबारक शाह अस–सुल्तान ७१६
१५	३·४२०	१·५८	"	"	"
१६	३·३३२	१·६०	७१७	"	दुहेरी कड्यांत:मुबारक शाह

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

क्रमांक	वजन	आकार	काल	पोट.	पाठ.
